# संपादकीय

आपल्या भारतीय समाजात धर्मभावना एवढी सर्वव्यापी बनली आहे की प्रत्येक सामाजिक प्रश्नाला धार्मिक संदर्भ निर्माण होतोच. त्यामुळे सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या, त्याचप्रमाणे स्त्रीमुक्तीच्या चळवळीत या धर्मश्रद्धेचा सतत अडथळा जाणवतो. सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात आपल्याला यशस्वी व्हायचे असेल तर धर्मकल्पनेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. धर्म म्हणजे काय? त्याचा उदय व विकास कसा झाला? इतिहास काळातील त्याचे कार्य कोणते? आजचे त्याचे स्वरूप कसे आहे? निरनिराळ्या धर्मांची स्त्रियांबद्दलची भूमिका काय आहे? भारतामध्ये, राज्यघटनेने लोकशाही, समाजवाद, धार्मिक स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता ही तत्त्वे मान्य केली आहेत. भारतामध्ये निरनिराळे धर्म, पंथ आणि उपासनापद्धती अस्तित्वात आहेत. तेव्हा आपल्या देशात धर्माचे स्थान कोणते रहाणार आहे? अशा विविध बाजूंनी धर्माचा विचार करायला हवा.

रानटी अवस्थेत मानवाला सृष्टीतील घडामोडींबद्दल वाटणाऱ्या विस्मय, भीती, कुतुहल अशा विविध भावनांतून यातुविधींच्या स्वरूपात प्राथमिक धर्मकल्पनेचा उदय झाला. माणूस स्थिर सामूहिक जीवन जगू लागल्यावर धर्मतत्त्व आणि विचार, आचार, श्रद्धा, उपासनापद्धतीरितीरिवाज आणि संस्था या स्वरूपात धर्माला अधिकाधिक संघटित स्वरूप येत गेले. अर्थात निरनिराळ्या प्रदेशातील व काळातील विशिष्ट भौतिक परिस्थितीनुसार त्यात परिवर्तनही होत गेले. मानवी संकृतीच्या इतिहासातील एका विशिष्ट टप्प्यावर धर्माने समाजजीवनाच्या नियमनाचे व नियंत्रणाचे कार्य केले. निरनिराळ्या धर्मानुसार मनुष्य-मनुष्यातील संबंध, मनुष्य व समाज यातील संबंध वगैरेसंबंधी विचार व नियम मांडून सामाजिक जीवन व्यवस्थित चालू ठेवण्याची महत्त्वाची भूमिका धर्माने बजावली हे खरे आहे.

परंतु विज्ञानाच्या प्रगतीबरोबर या सृष्टीतील घडामोडींमागील नियम, तत्त्वे मानवाला समजू लागली, या नियमांचाच उपयोग करून निसर्गावर प्रभुत्व मिळविणे काही प्रमाणात शक्य झाले. निसर्गाबद्दल अजून खूप अज्ञान असले तरी सर्व काही नियतीवर, दैवी शक्तीवर अवलंबून नाही, तर मानवाच्या इच्छेवर, प्रयत्नांवर खूपशा गोष्टी अवलंबून असतात याचा प्रत्यय मानवाला आला. त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

निरनिराळ्या धर्मांनी जरी भूतदया, सहृयता, सत्यनिष्ठा, परोपकार, समभाव यांसारख्या शाश्वत मूल्यांचा उद्घोष केला असला तरी प्रत्यक्षात दु:ख, निर्घृणता, विषमता, शोषण दूर करणे धर्माला शक्य झाले नाही. धर्माच्या नावाखाली हिंसा, अन्याय, अत्याचार आणि अनाचार निर्माण झाले. अंधश्रद्धा आणि बुवाबाजीला ऊत आला. समाजातील उच्चवर्गीयांकडून आणि उच्चवर्णीयांकडून कनिष्ठवर्गीयांची आणि दलितांची जी पिळवणूक केली जात होती तिला धर्मामार्फत तात्त्विक अधिष्ठान देण्याचे काम धर्माने केले. बहुसंख्यांना अज्ञानात आणि अंधश्रद्धेच्या पगड्याखाली ठेवून ही पिळवणूक शतकानुशतके चालू रहाण्यास मदत केली.

पुरुषप्रधान समाज व्यवस्थेला मान्यता देऊन आणि स्त्रियांवर अनेक धार्मिक बंधने घालून धर्माने स्त्रियांच्या पिळवणुकीलाही आधार दिला. स्त्रियांची अशा तऱ्हेने पिळवणूक हिंदूधर्माप्रमाणेच इतर सर्व धर्मांमध्येही आढळते हे लक्षात घेतले पाहिजे.

विसाव्या शतकात आपण स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही तत्त्वे मान्य केली आहेत. वैज्ञानिक प्रगती करून मोठ्या प्रमाणावर निसर्गावर ताबा मानवाने मिळविला आहे. भौतिक परिस्थितीमध्ये कमालीचा बदल झाला आहे. त्यामुळे रूढ धर्मविचार, आचार आणि उपासनापद्धती कालबाह्य ठरलेल्या आहेत. वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या आधारे मानवी जीवनातील दुःख, दैन्य, विषमता, शोषण दूर करणे शक्य आहे अशी आशा निर्माण झाली आहे. तेव्हा परिवर्तनाच्या लढ्यात अडथळा ठरणाऱ्या धर्मकल्पनेचे लवकरात लवकर उच्चाटन होणे आवश्यक आहे. भारतासारख्या देशात निरनिराळे धर्म, पंथ एकत्र नांदत आहेत. तेव्हा राज्य शासन धर्मनिरपेक्ष असणे अपरिहार्य आहे. पण त्याचबरोबर भारताने लोकशाही पद्धती स्वीकारल्यामुळे राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्यही दिली आहे. तेव्हा धर्मनिरपेक्षता आणि धार्मिक स्वातंत्र्य यांची योग्य सांगड किती कौशल्याने घातली जाते आणि त्याबाबत किती ठाम भूमिका घेतली जाते यावर आपल्या देशातील सामाजिक परिवर्तन आणि विकास अवलंबून राहील. धर्म ही खाजगी बाब मानली गेली पाहिजे, सामाजिक जीवन हे धर्मनिरपेक्ष राखू शकलो तरच देशाच्या विकासातील धर्माचा अडथळा आपण टाळू शकू.

आज अनेक प्रतिगामी शक्ती धर्माचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात आहेत. उच्चवर्गीयांचे हितसंबंध अबाधित राखण्याच्या दृष्टीने प्रस्थापित समाजव्यवस्था टिकवून धरण्यासाठी धार्मिक विचार व धर्मावरील अंधश्रद्धा जोपासण्याचे कार्य पद्धतशीरपणे व संघटितपणे चालू आहे. वृत्तपत्रे, नियतकालिके, चित्रपट, दूरदर्शन, आकाशवाणी आणि इतर लोकसंपर्क माध्यमांचा त्यासाठी सर्रास वापर केला जात आहे. काही अतिरेकी चळवळीही त्या अनुषंगाने उदयाला येत आहेत. धर्मांतरे, धार्मिक-जातीय अत्याचार, धार्मिक कलह या स्वरूपात फुटीर प्रवृत्ती जोपासल्या जात आहेत. दलित श्रमिकांची एकजूट मोडून काढण्याचे प्रयत्न त्याद्वारे होत आहेत. दलित-श्रमिकांच्या बाजूने उभे ठाकणाऱ्यांना सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात हे फार मोठे आव्हान स्वीकारावे लागणार आहे.

याच दृष्टीने आम्ही बायजाचा 'धर्म आणि स्त्रिया' हा विशेषांक दिवाळीच्या सुमारास वाचकाच्या हाती देत आहोत. धर्माची निर्मिती व स्वरूप, धर्माचे स्थान, धर्म व जातीव्यवस्था, धर्म आणि कायदे अशा धर्मासंबंधींच्या सर्वसाधारण बाबींवर चर्चा करणारे लेख या अंकात आहेत. त्याचप्रमाणे अंधश्रध्दा, बुवाबाजी यावर प्रकाश टाकणारे लेखही आहेत. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम, जैन व बौद्ध धर्मातील स्त्रियांचे स्थान विशद करणारे लेखही यात समाविष्ट केले आहेत. आमचा हा प्रयत्न अपुरा आहे याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. तरीही आहे या स्वरूपातसुद्धा वाचकांना आमचा हा अंक आवडेल अशी अपेक्षा आहे. धर्मावरील अंधश्रद्धेचा अंधार दूर होऊन विज्ञानदीपाच्या स्वच्छ प्रकाशात सामाजिक परिवर्तनाची वाटचाल अबाधित चालू रहावी म्हणून केलेला हा आमचा अल्पसा प्रयत्न. विज्ञाननिष्ठ विचारांचे शेकडो दीप उजळून आमचे वाचकही आमच्या कार्यात सहभागी होतील अशी अपेक्षा आहे. या अंकाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया वाचक आम्हाला कळवतील आणि सामाजिक प्रबोधनाच्या कार्यात बायजाला शुभेच्छा देतील अशी आम्हाला आशा आहे. आमच्या सर्व वाचकांना आणि हितचिंतकांना बायजातर्फे दीपावली शुभेच्छा.

—संपादक